महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई ४००००१

क्रमांक : १०/एडीम/प्रमाणपत्रे/२०२२/३९० दिनांक २३-५-२०२२

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी आवश्यक प्रमाणपत्रे

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभ्यासक्रम, प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माण शास्त्र, एच.एम.सी.टी., सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रम तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी पदवी, प्रथम वर्ष वास्तुशास्त्र, बी. प्लॅनिंग पदवी अभ्यासक्रम (Under Graduate), प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., फार्म डी., फार्म डी. (Post Baccalaureate), एम. आर्किटेक्चर, एम. प्लॅनिंग, एम.एचएमसीटी, एमबीए/एमएमएस, एमसीए हे पदव्युत्तर पदवी (Post Graduate) या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमधून करण्यात येतात. त्यासाठी अर्ज करताना प्रवेश नियमावलीत नमूद केलेल्या **आवश्यक त्या प्रकरणी लागू असणारी** खालील प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेऊन ती तयार ठेवण्याबाबत प्रवेशोच्छुक उमेदवारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे

- जात/जमात प्रमाणपत्र (Caste/Tribe Certificate)
- जात/जमात वैधता प्रमाणपत्र (Caste/Tribe Validity Certificate)
- नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र (Non- Creamy Layer Certificate) (दिनांक ३१ मार्च २०२३ पर्यंत वैध)
- अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate)
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गासाठी प्रमाणपत्र (EWS)
- दिव्यांगांबाबतचे प्रमाणपत्र (Person with Disability)
- सैन्य दलातील प्रवर्गासाठीचे प्रमाणपत्र (Defence)
- अल्पसंख्यांकासाठी प्रवर्गासाठीचे प्रमाणपत्र (Minority Certificate)
- आधार क्रमांक व संलग्नित बँक खाते

प्रवेशासाठी लागणाऱ्या प्रमाणपत्रांची तपशिलवार माहिती संचालनालयाच्या **http://www.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर पत्र क्रमांक क्रमांक : १०/एडीम/प्रमाणपत्रे/२०२२/३८९, दिनांक २३ मे, २०२२ अन्वये देण्यात आलेली आहे.

**सही/-**
**डॉ. अभय वाघ**
**संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**डी.जी.आय.पी.आर./२२-२३/C८६१**